॥ ॐ ॥

# विश्व हिंदू परिषद
# दुर्गा वाहिनी शौर्य प्रशिक्षण वर्ग २०११
# पश्चिम महाराष्ट्र प्रांत

या वर्षिचा दुर्गा वाहिनी शौर्य प्रशिक्षण वर्ग पुणे जिल्हयातील वडगाव मावळ येथील कै गोपाळराव देशपांडे वनवासी विद्यार्थी वसती गृह येथे दि.५ मे ते १२ मे या कालावधित संपन्न झाला. वर्गासाठी पंढरपू र ,सोलापुर सातारा,नासिक, पुणे जिल्हा व पुणे महानगर येथुन ३५ युवती शिबिरात आल्या.

दि. ५ मे पुर्वी गावात अनेक स्वागताचे मोठे फ्लेक्स लागले व वातावरण दुर्गा वाहिनीमय होउन गेले.

दि. ५ मे संध्याकाळ पासुन प्रशिक्षणार्थी युवती येउ लागल्या.दि. ६ मे २०११ ,अक्षय्य तृतीयेच्या सुमुहुर्तावर वर्गाचे उदघाटन झाले. उदघाटन सत्रात ह.भ.प. श्री. दाभाडे यांनी मराठयांच्या सर सेनापती सरदार उमाबाई साहेब दाभाडे (मावळ ) यांची शौर्यगाथा सांगुन युवतींच्या पुढे एक आदर्श मांडला. माननीय श्री व्यंकटेशजी आबदेव सर ( केंद्रिय मंत्री विश्व हिंदू परिषद ) यांनी विश्व हिंदू परिषदेची स्थापना , रा.स्व. संघाशी स्थापने पासुन असलेली जोडणी , विविध आयाम ,देशभरातील समित्यांची संख्या ,एकल विद्यालय ,सेवा कार्य , रामजन्मभूमी प्रश्न इ. विषयांची ओळख करुन दिली .

या पुढील दिवसात विविध सत्रांमधुन खालिल विषयांवर माहिती दिली गेली.

**बौध्दिक सत्र**

- दुर्गावाहिनीची स्थापना, उद्धेश, कार्य ,हिंदुत्वाची व्याप्ती : मा. ॲडव्होकेट मीनाताई बाम
- हिंदु समाजासमोरील ज्वलंत समस्या ,मुस्लीम आतंकवाद , ख्रिश्चनांचे धर्मांतरण करण्याचे षडयंत्र ,नक्षलवाद इ.चे अभ्यासपूर्ण विवेचन व त्याचे निराकरण करण्यासाठी संघटनात्मक कार्याची आवश्यकता. : मा. श्री. प्रशांतजी हरताळकर ( क्षेत्रिय संघटन मंत्री)
- हिंदु कुटुंब , हिंदु संस्कृतीचे सामर्थ्य , तसेच हिंदुंची जीवनमूल्ये : मा. श्री. प्रकाशजी क्षिरसागर ( प्रांत कार्य कारिणी सदस्य रा.स्व. संघ )
- संस्कार , परिवर्तन, नित्य उपक्रम यातुन संघटन : मा.श्री. भार्गवरावजी सरपोतदार ( क्षेत्रिय विशेष संपर्कप्रमुख )
- खरी स्त्रीमुक्ती व धर्माने केलेला स्त्रीचा मुक्त विचार : मा. श्री. विवेकजी सिन्नरकर ( संपादक हिंदु बोध )

**माहिती सत्र**

- हिंदु संस्कृतीची वैशिष्ठे : मा. श्री. सदुभाउ कुलकर्णी ( प्रांत धर्माचार्य संपर्क प्रमुख)
- लव्ह जिहाद : मा. रसिलाबेन शहा
- संस्कारक्षम मातृ शक्ती , समाज घडविण्यासाठी स्त्री चे महत्व : मा. सौ. कल्पनाताई अन्वेकर ( क्षेत्रिय महिला प्रमुख)
- सेवा कार्य त्याचे विविध आयाम उदा. एकल विद्यालय , शैक्षणिक , आरोग्य विषयक प्रकल्प इ.:मा. श्री. संजयराव माधव कुलकर्णी ( प्रांत सेवा सह प्रमुख )
- हिंदुंचा खरा इतिहास : मा. डॉ. सौ. निलाताई रानडे

**चर्चा सत्र**

- कुरिती , अंधश्रध्दा ,रुढी , परंपरा व त्यातुन बाहेर पडण्याचे मार्ग : मा. सौ. वल्लरी ताई पाध्ये ( प्रांत महिला प्रमुख )
- मुलींचे आरोग्य : मा. डॉ. सौ.रोहिणीताई विद्वांस
- कायदा , कायदयाचे उपयोग , मुलीसाठीचे कायदे : मा.ॲडव्होकेट मृणालिनीताई पडवळ (दुर्गा वाहिनी प्रांत सह संयोजिका )
- हिंदु रिती रिवाज आणि कार्यकर्ता काल , आज व उद्या : मा. सौ.कल्पनाताई क्षिरसागर

- विज्ञानाचे फायदे तोटे :मा. सौ. वल्लरीताई पाध्ये ( प्रांत महिला प्रमुख )

**कृती सत्र**

- शक्ति साधना केंद्र
- बाल संस्कार केंद्र
- सत्संग

पूर्ण दिवसाच्या दिनक्रमात पहाटे ४:३० वाजता उठणे, प्रातः स्मरण, सकाळी व संध्याकाळी २ तास शारिरीक त्या अंतर्गत दण्ड, योगासने ,योगचाप , नियुध्द , खड्ग छुरीका, एअरगन ,अडथळे पार करणे,शाखा लावणे इ.चे प्राथमिक शिक्षण व विविध खेळ इ.चा समावेश होता.संध्याकाळच्या शारिरीक नंतर सायंप्रार्थना,व भोजनोत्तर मनोरंजनाचे व मुलींचे विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम झाले.



समारोपाचा कार्यक्रम दि. ११ मे रोजी संध्याकाळी झाला. त्या अंतर्गत शोभा यात्रा संध्या. ६ वाजता सुरु झाली. शोभा यात्रेत सर्वात पुढे बँड पथक त्या नंतर सरसेनापती उमाबाईसाहेब दाभाडे यांच्या वेशात घोडयावर तलवार घेउन बसलेली युवती व तीच्या मागे शिस्तबध्द ध्वजपथक अशी रचना होती. मुलींच्या ध्वजपथकाच्या मागे कार्यकर्ते असे दृष्य होते.मुलींनी घोषणा देउन आसमंत दणाणुन सोडला होता, त्यामुळे शोभायात्रा पहाण्यासाठी आबालवृध्द रस्त्यावर गर्दी करुन उभे होते. शोभायात्रेवर पुष्पवृष्टी करण्यात आली. सर्व वातावरण हिंदुत्वाच्या उदघोषाने भारले गेले होते.

शोभा यात्रा , शूर सेनानी महादजी शिंदे यांनी इंग्रजांवर मिळविलेल्या विजयस्थानी , विजय स्मारकाजवळ नेउन महादजी शिंदे यांच्या पुतळयाला हार घालण्यात आला व स्मारकाला मानवंदना दिली. त्या नंतर ग्रामदैवत पोटोबा महाराज मंदीर प्रांगणात यात्रा आली असता मा. श्री. भार्गवराव सरपोतदार यांनी मंदीरात जाउन पोटोबा महाराजांना पुष्पहार अर्पण केला.जमलेल्या नागरीक व कार्यकर्त्यांसमोर युवतींनी विविध प्रात्यक्षिके सादर केली, त्यात योगासने मनोरे ,योगचाप, दण्डयुध्द , योगासने , नियुध्द , खड्ग, छुरीका, एअरगन इ.ची प्रात्यक्षिके झाली . तसेच भारताच्या इतिहासातील सुवर्णमयीक्षण पोखरण अणुस्फोट मुलींनी सादर केला.
यानंतर मुलींनी पोवाडा सादर केला. सौ. वल्लरी ताई पाध्ये यांनी प्रास्ताविक केले. मा. श्री. भार्गवराव सरपोतदार यांनी हिंदु समाज ,त्याची वैशिष्ठे ,देशावरील संकटे व त्यातुन बाहेर पडण्यासाठी संघटीत हिंदु समाजाची आवश्यकता असा विषय मांडला. पु. आचार्य विरेंद्र जी ( पतंजली योग पीठ ) यांनी आशिर्वचन दिले. पुर्ण कार्यक्रमाचे आपल्या ओघवत्या भाषाशैलीत , ॲडव्होकेट मृणालिनी ताई पडवळ यांनी सूत्रसंचालन केले.



दिनांक१२ मे ,सीता नवमीच्या मुहुर्तावर खाजगी समारोप यज्ञ करुन पार पाडला. यज्ञा समोर हिंदु धर्म रक्षणाची प्रतीज्ञा मुलींना देण्यात आली.याचे पौरोहित्य सौ. वल्लरी ताई पाध्ये यांनी केले. त्या नंतर लगेचच मुलींची वर्गा संबधिचे मनोगत या कार्य क्रमात प्रत्येकीने आपला शिबिराचा अनुभव मांडला.शिक्षिकांचा सुरुवातीला आलेला राग व नंतर मैत्रीत झालेले रुपांतर तसेच येताना ७ दिवस कसे जातील असे वाटत असताना आता घरी जाउचनये अशी भावना झाल्याचे सांगितले.

५ ते१२ मे या कालावधित पुढील पदाधिकारी , प्रमुख कार्यकर्ते यांनी वर्गाला भेट देउन मुलींचा उत्साह वाढविला. मा.श्री. एकनाथजी शेटे ( प्रांत अध्यक्ष ),मा. श्री. विजयराव करमरकर (प्रांत सह मंत्री) ,मा. श्री नागनाथजी बोंगर्गे ( प्रांत गोरक्षा प्रमुखर ), श्री. सतीशराव काकडे
( सचिव उद्घ्रायणी सेवा समिती ), श्री. विजयराव पोरे ( हिंदुबोध ), सौ. सुनितताई फाटक ( प्रांत कार्यकारिणी सदस्य ),श्री. मनोहरजी ओक (पुणे महानगर सह मंत्री ),श्री. धनाजी शिंदे (पुणे जिल्हा कार्यध्यक्ष ),श्री. पांडुरंग फ ाटक (पुणे जिल्हा सह मंत्री), श्री रविंद्र साळे (जिल्हा मंत्री पंढरपुर ) सहयोग फौंडेशन यमुनानगर निगडीचे कार्यक र्ते, श्री. दिलीपराव देशपांडे (जिल्हा सेवाप्रमुख ),श्री. श्रीकांतजी पत्की ( ट्रस्टी गोपाळ नवजीवन केंद्र ) श्री. दिनेश श्रीवास (पुणे जिल्हा बजरंगदल संयोजक) श्री. बाफनाजी ( वडगाव ) तसेच वडगाव व तळेगाव येथील प्रमुख कार्यक र्ते.

वर्गाच्या वर्गाधिकारी सौ. वल्लरीताई पाध्ये ,वर्ग कार्यवाहिका ॲडव्होकेट मृणालिनी ताई पडवळ ,मुख्य शिक्षिका कु. गौरी सोनावणे, सह शिक्षिका कुमारी स्वप्ना खामकर व कुमारी मृण्मयी म्हाळस, शिक्षिका प्रशिक्षक श्री. किशोर पंत आपटे ,कार्यालय प्रमुख सौ. आशाताई इनामदार यांनी जबाबदारी पार पाडली. वर्गा पुर्वी अनेक जिल्ह्यात सौ. अलकाताई माळी (प्रांत दुर्गा वाहिनी संयोजिका ) यांनी प्रवास करुन मुलींना वर्गात येण्यासाठी प्रवृत्त केले. तसेच सर्व सत्रांचे नियोजन महिला पालक , श्रीमती  शैलाताई देशपांडे यांच्या मदतीने सौ. अलकाताईंनी केले.
वर्गसमन्वयक म्हणुन  श्री. विजय देशपांडे ( पुणे जिल्हा मंत्री ) यांनी काम पाहिले. वर्ग महाव्यवस्थापकाची मोठी जबाबदारी श्री. अमोल पगडे ( बजरंगदल संयोजक वडगाव ) यांनी पाहिली.
वर्ग यशस्वी होण्यासाठी   गोपाळ नवजीवन केंद्र ट्रस्ट , श्री. अरुणभाउ ओखदे ( पुणे जिल्हा कार्यकारिणी सदस्य ) श्री. मनोज वाघ (अधिक्षक कै. गोपाळराव देशपांडे वनवासी वसती गृह ) यांनी सहाय्य केले.श्री. अर्जुन शिंदे ( बजरंगदल संयोजक मावळ तालुका) व तालुकयाचे सर्व बजरंगदलाचे कार्यकर्ते यांनी, पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे बजरंगदल सहसंयोजक श्री. संतोष भेगडे पाटील यांच्य्य कुशल नेतृत्वाखाली शिबिर संस्मरणीय केले.

वृत्तांकन : श्री. विजय देशपांडे ( पुणे जिल्हा मंत्री )